नि. फौजदारी खटला क्र. ११५/२०२३
सरकार विरूद्ध अरविंद शेळके
**निशाणी १४ खाली**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ तेजस्विनी माताप्रसाद दोहरे हिची उर्वरित उलटतपासणी शपथेवर सुरू — आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. के. पुराडउपाध्याय यांचे मार्फत —**

हे म्हणणे खरे आहे की, कमल नेट कॅफेला लागुन दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे हॉटेलपण आहे.

प्र.१. सकाळी ११—१२ वाजता त्याठिकाणी नेहमी गर्दी असते ?
उ. कधी कधी असते.

प्र.२. तुम्ही घटनेवेळी शिवाजी महाविद्यालय याठिकाणी एम.एस.सी करत होती हे दाखवण्यासाठी तुम्ही काही कागदपत्रे पोलीसांनी दिली होती का?
उ. त्यांनी मागितले नाही.

प्र.३. तुम्ही स्वत:हुन अशी कागदपत्रे दिली होती का ?
उ. नाही.

अकोट येथील शिवाजी कॉलेज व तेल्हारा येथील गोपाळराव खेडकर कॉलेज हे एकाच व्यवस्थापनाखाली काम करतात किंवा कसे हे मला माहित आहे. साक्षीदार पुन्हा सांगते की, मला निश्चित माहिती नाही. सदर दोन्ही कॉलेज एकाच संस्थेची असल्यामुळे कर्मचारी आंतरमहाविद्यालयीन बदली होते किंवा कसे हे मला माहित नाही. आरोपी याचे शिवाजी कॉलेज, अकोट व तेल्हारा येथील गोपाळराव खेडकर कॉलेज येथे जाणे—येणे आहे किंवा कसे हे मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा मोबाईल फोन जप्त केलेला नाही. पोलीसांनी माझा मोबाईल क्रमांकाचा सि.डी.आर रिपोर्ट प्राप्त करण्यासाठी माझी संमती घेतली किंवा कसे हे मला आता सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला अश्लिल फोन केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोणताही फोन केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडुन एक हजार रूपये फॉर्म भरण्यासाठी उसणवार घेतले होते व सदर पैसे आरोपीने परत मागु नये म्हणुन मी प्रस्तुत खोटी केस केली आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०५.०२.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.